पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक १५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २३/६/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उत्पन्नाचा आढावा**

**विषय क्र. २८२**

दि. ८/६/२००९ ते १४/६/२००९ अखेर आयातकर कार्यालयाचा जमा उत्पन्नाचा, रहदारी व बिगरजकात पकडलेल्या वाहनांचा व दंडात्मक कार्यवाहीबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. अतिमआ(ज)ओ/९३२ दि. १८/६/२००९ ने पाठविलेला तपशील माहितीसाठी.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २८३**

मा.सौ.चाँदबी नदाफ व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. १६/६/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ३९ प्रायव्हेट रोड येथील सांस्कृतिक भवनाचे उर्वरित काम करणे व फर्निचर करणे या कामासाठी खालीलप्रमाणे र.रुपये ८ लाखाचे वर्गीकरण करण्यांत यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाज पत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, सीपीटीएल-९/१५/५१, वॉर्ड क्र. ३९ सिध्दार्थनगर येथील जुने जीर्ण झालेले शौचालय पाडून नविन शौचालय बांधणे | ८ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. ३९ प्रायव्हेट रोड येथील सांस्कृतिक भवनाचे उर्वरित काम करणे व फर्निचर करणे | --- | ८ लाख |

**विषय क्र. २८४**

मा.विकास दांगट यांचे दि. १७/६/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. १३०, वडगांव बुद्रुक, सिंहगड रोड येथील स.नं. ५७, ५८, ५९ व ६३ येथील जागा पुणे मनपाने भूसंपादन करुन तेथे नियोजित १८ मीटर डी.पी.रोड तयार करावा.

**विषय क्र. २८५**

मा.विकास दांगट यांचे दि. १७/६/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. १३०, वडगांव बुद्रुक, सिंहगड रोड येथील स.नं. ५७ मधील ६अ मधील गार्डनसाठी आरक्षित असलेली जागा संबंधित मुळ मालकाकडून तडजोडीने पुणे मनपाने ताब्यात घेऊन याठिकाणी अत्याधुनिक पध्दतीचे उद्यान विकसित करावे.

**विषय क्र. २८६**

मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता यांचे दि. १७/६/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २३२ दि. १६/६/२००९ चा (लहान व मध्यम आकाराची घरे बांधण्यासाठी विकसकांना प्रोत्साहन मिळावे आणि पुणे मनपा यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करीत आहे, असा संदेश सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी ३० ते ५० चौ. सदनिकांच्या गृहप्रकल्पाकरीता प्रिमियममध्ये ५०% सवलत व ५० ते ८० चौ.मी. सदनिकांच्या गृहप्रकल्पाकरीता प्रिमियममध्ये २५% सवलत देणेबाबत) फेरविचार करण्यात यावा.

UnRegistered

**विषय क्र. २८७**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता व मा.मोहनसिंग राजपाल यांचे दि. १८/६/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २३२ दि. १६/६/२००९ चा (लहान व मध्यम आकाराची घरे बांधण्यासाठी विकसकांना प्रोत्साहन मिळावे आणि पुणे मनपा यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करीत आहे, असा संदेश सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी ३० ते ५० चौ. सदनिकांच्या गृहप्रकल्पाकरीता प्रिमियममध्ये ५०% सवलत व ५० ते ८० चौ.मी. सदनिकांच्या गृहप्रकल्पाकरीता प्रिमियममध्ये २५% सवलत देणेबाबत) फेरविचार करण्यात येवून मुळ विषय मान्य करण्यात यावा.

**विषय क्र. २८८**

मा.सौ.कमल व्यवहारे यांचे दि. १८/६/२००९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयामध्ये विवाह नोंदणी विभाग कार्यरत झालेले आहे. सदर ठिकाणी नविन वधु–वर दांपत्य विवाह नोंदणी करीता येत असतात. सध्या झाडे पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चाललेला आहे.पुणे शहरामध्ये वाहनांचे प्रचंड संख्या लक्षात घेता सर्वत्र प्रदुषणमय वातावरण निर्माण होत आहे.त्या अनुषंगाने पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होण्याकामी विवाह नोंदणीसाठी येणाऱ्या प्रत्येक दांपत्यांना दोन झाडे वाढण्यास मदत होईल.पुर्वी विवाह नोंदणीच्या ठिकाणी बराच खर्च येत होता. परंतु मनपा मध्ये हा विभाग सुरू झाल्यापासून अल्प रक्कमेत नोंदणी होत आहे. तरी असे केल्याने पर्यावरण निसर्गमय राहण्यासाठी त्यांच्याकडून हातभार लागेल.

वरील बाबीचा विचार करता स्थायी समिती मध्ये सदरचा ठराव मान्य व्हावा.तसेच झाडे लावताना पर्यावरणाचा समतोल राखण्यास उपयुक्त अशी झाडे लावण्यास सुचविण्यात यावे. असा ठराव मान्य करावा व सर्व क्षेत्रिय कार्यालयातील विवाह नोंदणी विभागास ठरावाची प्रत पाठविण्यात यावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २८९**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ३१/१/२००९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ३०/५/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१३४ दि. ११/६/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १,७२,५४५/– चा तक्ता माहितीसाठी.

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्रं. २९०**

करआकारणी व करसंकलन खात्याकडील हिंगणे खुर्द वॉर्ड क्र. ३,४,५ नमुना नं. ८ अ वरुन सन १९९९–२००० मधील हिंगणेखुर्द विभागाच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/१४६ दि. १५/६/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. २० सन २००८–२००९ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २९१**

मा.उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र. ३ यांचे नियंत्रणाखालील व्हेईकलडेपो विभागाकडील सन २००५–०६ ते २००८–०९ मधील खरेदी व दुरुस्ती, भाडे तत्वावर घेण्यात आलेली वाहने इ.टेंडर प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/१४७ दि. १५/६/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. २१ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

UnRegistered

**विषय क्रं. २९२**

आयातकर कार्यालयाकडील निर्गत रिफंड विभागाकडील निर्गत रिफंड क्लेम, निर्गत रिफंड तक्ता, निर्गत नोट, निर्गत दाखला, आयातकर पावती व अन्य अनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/१४८ दि. १५/६/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. २२ सन २००९-२०१० चा विचारासाठी.

**विषय क्रं. २९३**

मा.उप आयुक्त वि.क्र. १ यांचे नियंत्रणाखालील घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २००३-०४ ते २००५-०६ या आर्थिक वर्षातील विद्युत, पाणीपुरवठा, भवन, पथ, ग.व.नि. व ड्रेनेज विभागाकडील काही टेंडर प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/१४९ दि. १५/६/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. २३ सन २००९-२०१० चा विचारासाठी.

**विषय क्रं. २९४**

मा.क्षेत्रिय अधिकारी हडपसर कार्यालय यांचे नियंत्रणाखालील पथ विभागाकडील सन २००४-०५ ते २००६-०७ या आर्थिक वर्षातील टेंडरद्वारे करुन घेतलेल्या विविध कामांचे उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/१५० दि. १५/६/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. २४ सन २००९-२०१० चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्रं. २९५**

घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाकडील ज्यु.ग्रेड लेखनिक श्री.सखाराम बन्सी शिंदे यांचे निलंबन काळास दि. २४/३/२००९ रोजी पहिली सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवानियम ५८ मधील तरतूदीनुसार निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ१/१३८ दि. ११/६/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २९६**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहर पुनरुत्थान अभियानाअंतर्गत प्रोजेक्ट इम्प्लिमेंटेशन युनिट (PIU) मध्ये निवड केलेल्या ५ अधिकाऱ्यांची ६ महिनेकरिता केलेल्या नेमणूकीस वाढीव सहा महिने मुदतवाढ मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सेवि/१४३ दि. १५/६/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २९७**

पुणे महानगरपालिकेच्या विकास अभियंता विकास योजना विभागाकडील श्री.मोहन दगडू मारणे, आरेखक यांच्या निलंबन काळास दि. ३१/१/२००९ रोजी दुसरी सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवानियम क्र. ५८ नुसार निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/१४४ दि. १५/६/२००९ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं.२९८**

विश्रांतवाडी ते गुरुद्वारा बिल्डींग दरम्यान व ५०९ चौकातील जवळपास २०० मी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १३,७८,९९,६८७/- पेक्षा १४.०४% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ११,८५,३८,५७०=९५ पर्यंत काम करुन घेण्यास अधिक डांबर, स्टीलसाठी बाजारभावानुसार फरक व उर्वरित माल मटेरियलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक आदा करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/जनेराशपुअ/१४२ दि. १२/६/२००९ चे पत्र.

UnRegistered

## टेंडर्स न मागविता

**विषय क्रं. २९९**

पुणे महानगरपालिकेच्या मोटारींना लागणारे पेट्रोल व डिझेल मे.हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि., पुणे या भारत सरकारच्या अंगीकृत व्यवसाय करणाऱ्या उत्पादक कंपनीकडून पेट्रोल र.रुपये ४३,३३१.१९ प्रति किलोलिटर व डिझेल र.रुपये ३३,८३५.३८० प्रति किलोलिटर प्रचलित दराने आवश्यकतेनुसार त्यांचे दरपत्रकातील अटी स्विकारुन र.रुपये ११,००,००,०००/– पर्यंत मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५ मधील नियम क्र. २(२) नुसार करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नउपअव्हेडे/१५० दि. १८/६/२००९ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्रं. ३००**

पुणे महानगरपालिकेने रस्तारुंदी, शाळा, उद्याने, दवाखाने, पाणीपुरवठा व मल:निस्सारण प्रकल्प वैगेरे सार्वजनिक कारणांसाठी जागा संपादन करण्याच्या निरनिराळ्या योजना हाती घेतल्या असून, भूमी संपादनाच्या कायद्यानुसार करावयाच्या पुढील कार्यवाहीसाठी मा.भूमि संपादन विशेष अधिकारी क्र.(१५) व (१६), पुणे यांचेकडे सदर योजना पाठविलेल्या आहेत. मा.मुख्य सभा ठराव क्र. ६५ नुसार दि. ३१/३/२००९ रोजी सदर कार्यालयाची मूदत संपुष्टात येत असल्याने या दोन कार्यालयांची मुदत पुढील पाच वर्षांनी म्हणजे दि. १/४/२००९ ते ३१/३/२०१४ पर्यंत वाढविण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूप्रा/६० दि. २०/५/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १६/६/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ३०१**

मुंढवा सर्व्हे नं. ९ ते १४/२ येथे बायोगॅस प्रकल्प डी.बी.ओ.ओ.टी. या तत्वावर राबविणे या कामाचा मे.मेलहॅम इंजिनिअर्स प्रा.लि. या संस्थेशी कन्सेशन ॲग्रिमेंट व भाडेपट्टा करारनामा करणेस स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/१०८ दि.२/६/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १६/६/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ३०२**

पुणे गणेश पेठ अल्पना सिनेमा समोरील नाल्याचे स्लॅबवरील वाहनतळ चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या २ निविदांपैकी ठेकेदार पुणे युथ फौंडेशन यांना त्यांनी देऊ केलेली मासिक र.रुपये २,१११/– स्विकारुन ११ महिन्याकरीता चालविणेस देणे अगर फेरनिविदा मागविणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/१३५ दि. १०/६/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १६/६/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३०३**

पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट नं. ७६अ प्रभाग क्र. २९ लॉ कॉलेज रस्ता, शांतीशिला भागात मनपामार्फत बांधणेत आलेला जिम्नॅशियम हॉल व अभ्यासिका क्षेत्रफळ २४७.७७ चौ.मी. चे मा.नगर उपअभियंता(मुल्यांकन विभागाकडून मासिक भाडे र.रुपये ११,९५९/– प्रथम वर्षासाठी व प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ निश्चित केल्यानुसार ५ वर्षे कालावधीसाठी सदरची जागा भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी मनपाच्या अपेक्षित रकमेपेक्षा सर्वात जास्त मासिक भाडे र.रुपये १२,१५०/– देऊ करणारे ठेकेदार मे.सोमेश्वर फौंडेशन, स.नं. १९, सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे ८ यांची रक्कम स्विकारुन ताबा दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी भाडे तत्वावर चालविणेस देणेस, मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, त्याकरीता त्यांचेशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/१४३९ दि. २०/२/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १६/६/२००९ च्या सभेत ठरले होते.)

UnRegistered

**विषय क्र. ३०४**

केंद्र शासन अनुदानीत प्रकल्पाअंतर्गत मे.सेल्को इंटरनॅशनल प्रा.लि. हैदराबाद यांचेबरोबर सवलतीचा करारनामा करणेस व ५ वर्षाचे कालावधीनंतर त्यांना लँडफिल डेव्हलपमेंट व लँडफिल मेंन्टेनन्स पोटी फी अदा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/१२२ दि. ६/६/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १६/६/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. ३०५**

पुणे, पेठ लोहगांव स.नं. १३४ या मिळकतीचे रामवाडी जकात नाका ते नवीन महानगरपालिका हद्द या ६० मी.डी.पी.नगररस्त्यासाठी संपादन करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भुप्रा/१३९ दि. १२/६/२००९ चे पत्र.

**विषय क्र. ३०६**

ॲड्.सौ.अलका डबीर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या परचेस नोटीसीनुसार चिल्ड्रेन प्लेग्राऊंडच्या आरक्षणाने बाधित होणाऱ्या पुणे पेठ कसबा घरांक १३७७ व १३८३, १३८४ या तिन्ही मिळकतीची एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/१४५ दि. १६/६/२००९ चे पत्र.

**विषय क्र. ३०७**

संरक्षण खात्यास बांधून द्यावयाच्या मिळकतींकरिता आवश्यक रक्कम वर्गीकरणाने उपलब्ध होणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/जनेराशपुअ/१४७ दि. १६/६/२००९ चे पत्र.

**विषय क्र. ३०८**

र.रुपये ३५ कोटी १ वर्षे १ दिवस मुदतीसाठी गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/१४८ दि. १८/६/२००९ चे पत्र.

**विषय क्र. ३०९**

र.रुपये १५ कोटी १ वर्षे १ दिवस मुदतीसाठी गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/१४९ दि. १८/६/२००९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered

## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २३/६/२००९

### विषय क्र. ३१०

मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.सुनिल बिबवे, मा.अशोक येनपुरे, मा.हनिफ शेख यांचे दि. २३/६/२००९ चे पत्र.

बाणेर स.नं. २७० मधील मुख्य बाणेर म्हाळुंगे रस्त्यापासून दक्षिणेकडे आत (पेट्रोल पंपासमोरील) जाणारा रस्ता सलग शेवटी पश्चिमेला वळून पुन्हा मुख्य बाणेर म्हाळूंगे रस्त्यास महाबळेश्वर हॉटेल समोर येऊन मिळतो. सदर अस्तित्वातील रस्त्याचा काही भाग ७.५० मिटर रुंदीचा आहे. काही भाग ६ मिटर रुंदीचा आहे. सदर रस्त्याची लांबी व सदर रस्त्यावरील वाहतुक विचारात घेता रस्ता ९ मिटर रुंदीचा करणे आवश्यक आहे. तरी सदर संपूर्ण रस्ता कलम २१० अन्वये ९ मिटर रुंदीचा आखण्यास मान्यता देण्यात यावी.

### विषय क्र. ३११

मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २३/६/२००९ चे पत्र.
वॉर्ड क्रं. ११६ मध्ये शाळा बांधणेसाठी र.रुपये ५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यांत यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९– २०१० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १७६, अ.क्र. ९१, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे (यादी क्र. एस–२७), पान क्र. २५५, अ.क्र. ३२, वॉर्ड क्र. ११६, स.नं. ४३ पर्वती येथील बागुल उद्यानासमोरील कॉम्प्युटर लायब्ररी विकसित करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ११६ मध्ये शाळा बांधणे | --- | ५० लाख |

### विषय क्र. ३१२

मा.विरेंद्र किराड व मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता यांचे दि. २३/६/२००९ चे फेरविचाराचे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २७७ दि. १६/६/२००९ चा फेरविचार करण्यात यावा.

(पुणे, पेठ भवानी सि.स.नं. ४९ पैकी ४९/अ, ब, क, ड ही जागा चिल्ड्रेन प्ले ग्राऊंडकरिता राखीव असून पुणे, पेठ भवानी सि.स.नं. ४९/अ येथील जागा भूसंपादन कायद्यान्वये संपादन करण्याबाबत)

### विषय क्र. ३१३

मा.अशोक येनपुरे, मा.शाम देशपांडे व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २३/६/२००९ चे पत्र.

पुणे जिल्हा कॅरम संघटनेच्या वतीने व महाराष्ट्र कॅरम संघटना,ऑल इंडिया कॅरम फेडरेशन व एशियन कॅरम कॉन्फेडरेशन यांच्या मान्यतेने महापौर चषक एशियन कॅरम चॅम्पीयनशिप स्पर्धा शिवछत्रपती क्रिडा संकुल, बालेवाडी ,पुणे याठिकाणी दिनांक ८ ते १५ ऑगस्ट २००९ दरम्यान ही स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. एशियन कॅरम चॅम्पीयनशिप स्पर्धा संपूर्ण भारतात व आंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत प्रतिष्ठीत मानली जाते.सदर स्पर्धेत एकूण १० (दहा) देश भाग घेणार असून त्यामध्ये भारत, जपान, मलेशिया, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश,मालदिव,कोरिया,नेपाळ, यू.ए.ई. इत्यादी देश भाग घेत आहेत.

यापूर्वी जानेवारी २००६ मध्ये पुणे जिल्हा कॅरम संघटनेच्या वतीने पुणे महापौर चषक राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा यशस्वीरित्या आयोजित करण्यात आलेली होती.या प्रतिष्ठीत स्पर्धेसाठी प्रत्येक देशातील मानांकित पुरुष व महिला खेळाडू भाग घेणार आहेत. या स्पर्धा सात विभागात घेण्यात येणार आहेत.तसेच स्पर्धेचा कालावधी ८ दिवसांचा आहे. या स्पर्धेतील खेळाडू,रेफरी,कोच ,मॅनेजर्स तसेच सर्व देशांचे पदाधिकारी यांच्याकरिता राहण्याचा व जेवणाचा खर्च, स्पर्धेच्या उत्तम संयोजनासाठी हॉलचा खर्च,बक्षिसे व स्मृतीचिन्हे,खेळाची प्रसिध्दी व इतर खर्च याकरिता अंदाजे ३७ ते ३८ लाखाचा खर्च अपेक्षित आहे.

सदरची स्पर्धा पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने उत्तमरित्या पार पाडण्याकरिता या स्पर्धेचे सहप्रायोजकत्व पुणे महानगरपालिकेने स्विकारुन या स्पर्धेकरिता रक्कम रुपये १० लाख (दहा लाख) निधी मंजूर करणेस मान्यता द्यावी.

UnRegistered

**विषय क्र. ३१४**

सन २००८–०९ मधील अंदाजपत्रकीय कामे पूर्ण करणेसाठी सन २००९–१० मध्ये आवश्यक असलेल्या कर्जाबाबत व सन २००९–१० साठी अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/१६१ दि. २३/६/२००९ चे पत्र.

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ अन्वये कलम १०१ मधील तरतूदीनुसार,

१) सन २००८–२००९ च्या अंदाजपत्रकीय कर्ज र.रुपये २७६.४६ कोटी सन २००९–२०१० अर्थसंकल्पीय जमा बाजूस वाढविणेस व त्वरीत उपलब्ध करुन देणेस

२) सन २००८–२००९ मधील अपूर्ण कामे पूर्ण करणेसाठी उपरोक्त रकमेपर्यंतची कामे सन २००९–२०१० च्या अर्थसंकल्पीय अनुदानात खर्च बाजूस वाढ करुन उपलब्ध करुन घेणेस

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

UnRegistered